# क्लारा हेल

## गरजवंतांची माता



मराठी अनुवादः सुशील मेन्सन



*क्लारा हेल* यांना ड्रग ॲडिक्ट तान्ह्या मुलांसोबत काम करण्यासाठी ओळखले जाते. चित्रात त्या काही मुलांसोबत आपला 83 वा वाढदिवस आनंदाने साजरा करत आहेत.

## माता हेल

पाहाताक्षणी, मुलांची खेळायची ती खोली एखाद्या सामान्य डे-केयर सेंटरसारखी दिसते. छोटी छोटी बारा मुले बाहेर जाण्यासाठी त्यांचे कोट आणि स्वेटर शोधत खोलीत इकडेतिकडे पळत असतात. एक छोटीशी कृष्णवर्णीय स्त्री हे सगळं बघत दारात शांतपणे उभी असते. ती मंदपणे हसत असते कारण मुले तिचे लक्ष वेधून घेण्यासाठी एकमेकांशी स्पर्धा करत असतात.

“इकडे बघ, हेल आई,” एक तीन वर्षे वयाचा मुलगा ओरडतो. “मी मायकेल जॅक्सन आहे!”

“हे बघ, मी काय केलंय!” छानसे कपडे घातलेली एक मुलगी मोठ्या अभिमानाने तिने काढलेले चित्र दाखवत म्हणते.

सगळे काही ठीकठाक दिसत असले तरी ही मुले सामान्य नाहीत. ती ड्रग ॲडिक्ट लोकांची मुले आहेत. यातील प्रत्येक मुलालाही ड्रग्जचे व्यसन आहे.

इथे “आई” म्हणजे क्लारा हेल. त्या न्यूयॉर्कच्या हेल हाऊसच्या संस्थापक आहेत. हेल हाऊस हे ड्रग ॲडिक्ट मुलांचे तात्पुरते घर आहे. अमेरिकेत अशा प्रकारचे हे एकमेव ठिकाण आहे. हॉस्पीटलचे कर्मचारी, पोलीस अधिकारी आणि निराश माता यांना दुसरा कोणताही पर्याय दिसत नसला की ते मुलांना माता हेलकडे आणतात.

हेल हाऊसमध्ये दोन आठवडे ते तीन वर्षे वयाची मुले राहातात. बरीचशी मुले इथे 18 महिने वास्तव्य करतात. नंतर त्यांना संगोपन केंद्रात ठेवतात किंवा त्यांच्या खऱ्या आईकडे पाठवतात. या मुलांना ड्रगच्या विळख्यातून, त्याच्या वेदनांतून मुक्त करणे, हे हेल यांचे मिशन आहे. या मुलांनी आनंदी, निरोगी आणि समृद्ध आयुष्य सुरू करावे, यासाठी त्या त्यांना मदत करतात.

## प्रेमाचा पाया

क्लारा हेलचा जन्म पेनसिल्व्हेनिया राज्याच्या *फिलाडेल्फिया* शहरात झाला. चार भावंडांमध्ये ती सर्वात धाकटी होती. ती लहान असतानाच तिच्या वडिलांचा मृत्यू झाला. तिच्या आईने चार घरी स्वयंपाक करून आणि आपल्या घराचा काही भाग भाड्याने देऊन आपले घर चालवले. “आईने मला लोकांवर प्रेम करायला शिकवलं. मी आयुष्यभरात जे काही केलं त्याचा पाया माझ्या आईने रचून ठेवला होता,” हेल म्हणतात.
हायस्कूलचे शिक्षण झाल्यावर, हेलने *थॉमस हेल* यांच्याशी लग्न केले आणि त्या न्यूयॉर्क येथे राहायला आल्या. तिथे त्यांच्या पतीने फरशा पॉलिश करण्याचे काम सुरू केले. “त्यांना फार कमाई होत नसे. म्हणून मी रात्री घरकाम, थिएटरची साफसफाई वगैरे करू लागले,” हेल त्यांच्या आठवणी सांगते.



क्लारा हेलचे पाच खोल्यांचे घर बऱ्याच मुलांसाठी संगोपन केंद्र बनले.

वयाच्या 27 व्या वर्षी हेल या *लॉरेन* आणि *नथान* या दोन मुलांची आई होत्या. पण त्यानंतर त्यांच्या पतीचे कर्करोगाने निधन झाले. हेलसाठी त्यांनी मागे काही पैसा, धनदौलत ठेवली नव्हती.

“मला माझ्या मुलांचं संगोपन करायचं होतं,” हेल म्हणते, “म्हणून मी दिवसा इतरांच्या मुलांना सांभाळायचं काम करू लागले. या कामासाठी मला मुलांचे आईवडील काही पैसे देत. मला भरपूर पैसा मिळत नसे. पण पोटाची भूक भागवायला ते पुरेसे होते. त्या मुलांना आमचं घर इतकं आवडलं की इथे आल्यावर ती घरी जायचं नाव घेत नसत. हळूहळू मी मुलांची पूर्णवेळ देखभाल करू लागले. आठवड्याच्या शेवटी, मुलांचे पालक त्यांना भेटायला येत.”

अचानक क्लारा हेल यांना जाणवले की त्या मुलांची दत्तक पालक बनल्या आहेत. घरांमध्ये काही समस्या असलेले पालक आपल्या मुलांना काही काळ हेल यांच्यासोबत ठेवू लागले. पुढील 30 वर्षे, हेल यांचे 146 मार्गावरील, पाच खोल्यांचे अपार्टमेंट हे एकावेळी सात-आठ दत्तक मुलांचे घर बनले.

“माझी मुलगी म्हणते की ती सोळा वर्षांची होईपर्यंत तिला वाटत होते की ही सगळी मुलं तिची सख्खी भावंडंच आहेत,” हेल सांगतात. “प्रत्येक मूल मला आई म्हणूनच हाक मारायचं. मी चाळीसपेक्षा जास्त मुलांची देखभाल केली. ते सगळे आता मोठे झालेयत. कुणी डॉक्टर, कुणी वकील आणि कुणी काही बनलेयत.

आता हेल दत्तक पालक म्हणून निवृत्त होण्यास तयार होत्या. “मी 65 वर्षांची झाल्यावर मुलांच्या देखभालीचं काम बंद करायचं ठरवलं. महागाई खूप वाढली होती आणि तेच तेच काम करून करून मी थकलेही होते,” हेल सांगतात.

त्यावेळी लहान ड्रग अॅडिक्ट मुलांची देखभाल करायचे त्यांच्या मनातही नव्हते.

“पण एकदा माझ्या मुलीने रस्त्यावर एका बाईला पाहिलं. तिच्या हातात एक मूल होतं. ती नशेत होती आणि ते मूल तिच्या हातातून खाली पडायच्या बेतात होतं. माझ्या मुलीने तिला मदत हवी का म्हणून विचारलं आणि माझी माहिती दिली. पुढल्या दिवशी, ती बाई माझ्या घरी आली. आम्ही ते मूल सांभाळायचं ठरवलं. फक्त दोन महिन्यांची होती ती तान्ही मुलगी! त्या बाईने तिच्या मैत्रिणींनाही माझ्याबद्दल सांगितलं. दोन महिन्यात आमच्याकडे अशी 22 मुलं देखभालीसाठी दाखल झाली,” हेल सांगतात.

स्त्री गर्भवती असते तेव्हा तिच्या खाण्यापिण्याचा प्रभाव थेट तिच्या गर्भावर पडतो. ती ड्रग्जची नशा करत असेल तर ते ड्रग्ज तिच्या रक्तातून गर्भाच्या रक्तात जात असते. परिणामी, त्या गर्भालासुद्धा त्या नशेचे व्यसन लागते. मूल जन्मल्यावर, ते या व्यसनाची सारी लक्षणे दाखवते.



हेल हाऊसच्या अध्यक्षा आणि क्लारा हेल यांची मुलगी डॉ. लॉरेन हेल, चार वर्षांच्या एका मुलाच्या हाताचा पापा घेत आहेत. मुलाची आई ते कौतुकाने बघत आहे.

हेल सांगते, “ते पहिल्यांदा माझ्याकडे आले त्याआधी मी ड्रग ॲडिक्ट लहान मुलाला कधीच बघितलं नव्हतं. ते स्वत:ला ओरबाडून घेतात आणि वयाने मोठे असलेल्या ॲडिक्टसारखं आपलं डोकं हलवत राहातात. ते चेहरा वेडावाकडा करतात. त्यांना पाहून दया येते. मला जाणवलं की आपण यांना मदत केली नाही तर ही मुलं मोठी झाल्यावर ड्रग ॲडिक्ट होतील. त्यामुळे या लहान वयातच आपण त्यांची काळजी घेतली पाहिजे. मी फक्त त्यांना प्रेम आणि भरपूर खाऊ देते. मी त्यांना गाणी ऐकवते. त्यांच्यासोबत फरशीवर चालते. महिन्याभरात त्यांचं हे व्यसन नाहीसं होतं.”

“मला मुलं खूप आवडतात,” हेल म्हणते. “प्रत्येक मूल काही खास गुण घेऊन जन्मतात. आपण त्याचे हे गुण बाहेर काढले तर तो एक चांगला माणूस बनू शकतो. पण त्यांना चांगल्या सुरुवातीची गरज असते. त्यांना भरपूर प्रेमही हवं असतं.”

हेलला तिच्या स्वत:च्या मुलांकडून पैशाचे पाठबळ मिळते. हेलची मुले चांगल्या हुद्द्यांवर नोकऱ्या करतात. लॉरेनने बालविकास विषयात पीएचडी केली आहे. नाथन हा शासनमान्य सार्वजनिक लेखापाल आहे आणि हेलचा दत्तक मुलगा केनेथ याने शिक्षणक्षेत्रात डॉक्टरेट मिळवली आहे. त्यांच्या मदतीने, हेलने तिच्या घरीच ॲडिक्ट मुलांची देखभाल केली, साधारण दीडेक वर्षे!

“शहरातल्या लोकांनी प्रथमच माझ्याबद्दल ऐकलं की एक वेडी बाई ड्रग ॲडिक्ट मुलांची काळजी घेते, कसलीही फी न घेता,” हेल म्हणते. “ते ॲडिक्ट आहेत. मला द्यायला त्यांच्याकडे काही नाही.

कुणीतरी मला सुचवले की शहर प्रशासनाला आवाहन करा. ते केल्यावर प्रशासनाने त्वरीत आम्हाला पैशाची मदत केली तसेच एक मोठी जागा शोधायलाही मदत केली.” हेलला एका मोठ्या जागेची खूप गरज होती.

## हेल-हाउस

हेलला न्यूयॉर्क शहराच्या हार्लेम भागात 122 व्या रस्त्यावर तपकिरी दगडांपासून बनलेल्या एका पाच मजल्यांच्या इमारतीत जागा मिळाली. ही इमारत मोडकळीस आली होती. इमारतीची डागडुजी करून हेलने 1975 साली या नव्या घरात प्रवेश केला. ती या घराला *हेल हाऊस* म्हणू लागली.

पहिल्या मजल्यावर हेलने खेळायची खोली बनवून त्यात पुस्तके व खेळणी ठेवली. लगतच्या खोलीत हेलने स्वयंपाकाला लागणारे जिन्नस भरून त्याचे स्वयंपाकघर केले.

दुसऱ्या मजल्यावर बालवाडी होती. हेलने ही खोली नक्षीदार चमचमत्या फुलाफुलांच्या वॉलपेपरने सजवली. हेलने ड्रग अॅडिक्ट तान्ह्या मुलांसाठी येथे नऊ पाळणे ठेवले. तिसऱ्या मजल्यावर क्लारा हेल यांची खोली होती. त्यांनी आपल्या खोलीला नक्षीदार पडदे आणि व्हिक्टोरियन दिवे लावून सजवले. या खोलीत आरामखुर्चीसुद्धा होती. हेल त्यात लहान मुलांना बसवून हलवत-डुलवत असे आणि त्यांच्या वेदना कमी करत असे.



हेल हाऊसच्या दुसऱ्या मजल्यावर असलेल्या बालवाडीत क्लारा हेल एका तान्ह्या मुलाची देखभाल करताना.

"तान्ह्या बाळाला मी चार महिने ठेवते इथे," हेल म्हणते, "तोवर त्याची व्यसनाची लक्षणं नाहीशी होतात, ते आरामात झोपू शकतं."

हेलच्या खोलीलगत एक दिवाणखाना होता. तिथे आरामदायक निळे, पांढरे सोफे, जाडजडू निळे गालिचे आणि एक भव्य मोठा पियानो होता. ही खोली बनवण्याचा एक खास उद्देश होता – इथे जुनाट जखमा भरून निघायला मदत होत असे.

"मुलांच्या आया येतात, तेव्हा इथेच भेटतात मुलांना," हेल म्हणते. "इथे छान वाटतं मनाला! मुलं इतक्या प्रसन्न वातावरणात राहातात, हे पाहून आईबापसुद्धा तसंच राहायचा प्रयत्न करतात. ती खरंतर चांगलीच माणसं आहेत. फक्त त्यांनी काही चुका केल्यायत. पण चुका करणं हा आपला हक्कच आहे."

*नॅन्सी* ही अशीच एक ड्रग ॲडिक्ट आई होती. तिचा मुलगा *राफेल*, हेल हाऊसमध्ये राहात असे. नॅन्सी पाच वर्षांपासून ड्रग घेत होती. ती ड्रग्ज विकून आणि चोऱ्या करून नशेसाठी पैसे मिळवत असे. पण पोलिसांनी पकडल्यावर तिला चार वर्षांचा तुरुंगवास झाला. तुरुंगातून सुटल्यावर नॅन्सी पुन्हा ड्रग्ज घेऊ लागली. त्याचवेळी ती गरोदर राहिली होती. राफेलचे वडीलसुद्धा ड्रग ॲडिक्ट होते. आपल्या पोटातील मुलालाही ड्रग्जचे व्यसन लागेल, याची नॅन्सीला कल्पना नव्हती. जन्मानंतर राफेलला बऱ्याच वेदना होऊ लागल्या. शेवटी नॅन्सी त्याला घेऊन हेल हाऊसमध्ये आली.

बरेच पालक त्यांच्या मुलांना हेल हाऊसमध्ये ठेवून स्वतःचे पुनर्वसन करण्याचे मार्ग शोधत. आपले व्यसन सुटल्यावर ते मुलांना परत घेऊन जात. काही पालक परत येत नसत. मग हेल त्यांना दत्तक देत असे.

खरंतर, मुले आणि पालक यांचा पुनर्मिलाप घडवून आणणे, हा हेल हाऊसचा एक उद्देश होता. मूल दत्तक देण्याचा पर्याय हा शेवटचा मार्ग होता. 1984 पर्यंत, पाचशेपेक्षा जास्त मुले हेल हाऊसमध्ये आली. त्यांपैकी फक्त 12 मुलांना दत्तक द्यावे लागले. 1990 पर्यंत, हेल आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांनी सुमारे 800 तान्ह्या मुलांची देखभाल केली.

मूल ज्यांना दत्तक द्यायचंय, त्या पालकांची हेल कसून चौकशी करत. त्यांच्यात काही कमीजास्त आढळले तर त्या मूल दत्तक देत नसत. "आम्ही चिल्ड्रन एड सोसायटीमार्फत मूल दत्तक देतो. पण त्या पालकांना इथे येऊन माझ्या कसोटीला उतरावंच लागतं. ते असंच मुलांना घेऊन जाऊ शकत नाहीत."

डॉ. लॉरेन हेल या हेल हाऊसच्या अध्यक्षा होत्या. त्या संस्थेच्या आर्थिक बाबी सांभाळत. त्यामुळे क्लारा हेल मुलांवर लक्ष केंद्रित करू शकत. 1984 साली हेल हाऊसचा खर्च 1,47,000 डॉलर्स एवढा होता. त्यांपैकी 1,22,000 डॉलरची मदत शहर प्रशासनाने केली होती.




अनेक सुप्रसिद्ध लोकांनी हेल हाऊसला आधार दिला. चित्रपट निर्माता *स्पाईक ली* यांनी ड्रग ॲडिक्ट लहान मुलांना वाचवण्यासाठी क्लारा हेल यांच्या मोहिमेला एक लाख डॉलर रक्कम देणगी म्हणून दिली.

बाकीचा पैसा देणगीरुपात मिळाला. पूर्वी बिटल वाद्यवृंदात असलेले सुप्रसिद्ध गायक-संगीतकार *जॉन लेनन* हे हेल यांचे एक हितचिंतक होते. हेल हाऊस बंद पडू नये म्हणून त्यांनी भरघोस मदत केली. तरीही ही मोहीम चालवायला पैशाची उणीव भासत असे.

“पैशाची नेहमीच कमतरता असायची. कर्मचाऱ्यांना आठवड्याला फक्त 175 डॉलर एवढाच मोबदला मिळायचा. पण या कामाला त्यांनी स्वत:ला वाहून घेतलं होतं,” लॉरेन हेल सांगतात.

शहर प्रशासनाने हेल हाऊसला एकावेळी फक्त 15 मुले सांभाळायची परवानगी दिली होती. त्यामुळे तिथे प्रवेश घेण्यासाठी तीस किंवा त्यापेक्षा जास्त मुले नेहमी प्रतिक्षा यादीत असत.

हेल मुलांची देखभाल करत तेव्हा त्यांचे पालक स्वत:च्या व्यसनावर उपचार करून घेत. हा उपचार 18 महिने चालत असे. “चांगला उपचार करणारी केंद्रे कमीच आहेत. पण आम्ही आमच्या उपक्रमाबद्दल समाधानी आहोत. आमच्याकडे आल्यानंतर कुणीही आई पुन्हा ड्रग ॲडिक्ट बनली नाही,” लॉरेन हेल सांगतात.

हा उपक्रम मुलांसाठीही फायदेशीर ठरला. हेल हाऊसमध्ये तान्ह्या वयात आलेली ड्रग ॲडिक्ट मुले मोठी झाल्यावर पुन्हा ड्रग्जकडे वळली नाहीत. पण सगळ्याच गोष्टी मनासारख्या झाल्या नव्हत्या. आईचे व्यसन गर्भात असतानाच लागल्यामुळे या मुलांच्या शिकण्याच्या क्षमतेवर दुष्परिणाम झाला होता.

हेल आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांनी मुलांना हे कधीही सांगितले नाही की ते जन्मले तेव्हा ड्रग ॲडिक्ट होते. कारण मग त्यांना स्वत:ची लाज वाटू लागेल, अशी भीती हेल यांना वाटे.

क्लारा हेल यांचे आपल्या या मुलांशी घट्ट भावनिक नाते तयार झाले होते. पण ते हेल हाऊस सोडून जात तेव्हा त्यांना दु:ख होत नसे. "मला दु:ख नाही व्हायचं, कारण जेव्हा कुणी मूल इथून जायचं तेव्हा एका नवीन मुलाला प्रवेश मिळायचा," हेल म्हणतात. "कुणी जातंय म्हणून दु:ख करण्याएवढा वेळच नसायचा माझ्याकडे. शिवाय, सुरुवातीपासून मी स्वत:ला बजावायचे की ही आपली स्वत:ची मुलं नाहीत. देवाच्या कृपेने मला स्वत:चा एक मुलगा आणि मुलगी आहेत. त्यामुळे मला चिंता करायचं कारण नाही. तेव्हापासून माझ्या अवतीभवती सतत मुलांचा राबता राहिला."

हेलने आपला बराचसा वेळ या मुलांना दिला. पण त्याची कधी त्यांनी तक्रार नाही केली. "त्यांना प्रेमाशिवाय देण्यासारखं माझ्याकडे होतं तरी काय! त्यांना प्रेम देण्यातच माझं सुख होतं. मुलं मोठी झाल्यावर कधी भेटायला आली, तर ते जबाबदार नागरिक बनलेयत, हे पाहून मला खूप बरं वाटतं, आपलं आयुष्य खऱ्या अर्थाने सार्थकी लागलंय असं वाटतं, त्यामुळे कसलीही खंत नाही," हेल म्हणतात. वर्षानुवर्षे, हेल मुलांची देखभाल करण्यासाठी कष्ट करत राहिल्या. त्यांच्या या उत्कृष्ट कार्यासाठी त्यांचे नाव सर्वदूर पसरले. 1985 साली राष्ट्राध्यक्ष रेगन यांनी त्यांना "खरा अमेरिकी हिरो" हा किताब दिला.



राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन क्लारा हेल यांना भेटले, तो क्षण. रेगन यांनी हेल यांचा "खरा अमेरिकी हिरो" असा सन्मान केला.




हेल हाऊसला शहर आणि राज्यांकडून समर्थन मिळवण्यासाठी क्लारा हेल यांनी बरेच प्रयत्न केले. राज्यांकडून त्यांना 11 लाख डॉलरचा चेक मिळाला. चित्रात हेलसोबत सिनेटचे सदस्य अल्फान्सो डी'अमाटो, मुलगी लॉरेन आणि न्यूयॉर्क शहराचे प्रतिनिधी चार्ल्स रेंजल दिसत आहेत.

1989 पर्यंत, दरवर्षी हेल हाऊसला शहर आणि राज्य प्रशासनांकडून 3,70,000 डॉलर एवढी मदत मिळाली. याशिवाय 4,00,000 डॉलर देणगीरुपात मिळाले. मग हेलच्या कार्याला राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली. मार्च 1989 मध्ये, हेलला सार्वजनिक कार्यासाठी ट्रुमन पुरस्कार मिळाला.

## हेल हाऊस गृह निर्माण प्रकल्प

त्याच वर्षी, हेल यांनी एक नवा उपक्रम सुरू केला, *हेल हाऊस गृह निर्माण प्रकल्प*. हा 35 अपार्टमेंट असलेला वीस लाख डॉलरचा प्रकल्प होता. ड्रग पुनर्वसन केंद्रात पूर्ण उपचार घेऊन आयुष्याला नवे वळण देऊ पाहाणाऱ्या तरुण मुलींसाठी हा प्रकल्प होता.

जानेवारी 1990 मध्ये, हेल हाऊस गृह निर्माण प्रकल्पाला एका सुप्रसिद्ध स्वयंसेवकाची मदत लाभली. न्यूयॉर्कमधील हेम्सले हॉटेलची मालकीण *लिओना हेम्सले* यांना कर चुकवल्याबद्दल शासनाने दोषी ठरवले. शिक्षा म्हणून त्यांना या प्रकल्पासाठी 750 तास सामुदायिक सेवा देण्याची अट घातली.

हेल यांनी हेम्सले यांच्या मदतीचे स्वागतच केले. हेम्सले यांच्यासारख्या प्रसिद्ध स्त्रीने गरजू स्त्रियांसोबत काम करणे, ही कल्पना हेल यांना विलक्षण वाटली.

हेम्सले या स्त्रियांना हॉटेल व्यवसायाबद्दल प्रशिक्षण देऊ शकतात आणि त्यांना नोकऱ्या मिळवण्यास मदत करू शकतात, असे हेल यांना वाटले.

## आमेन

12 फेब्रुवारी 1990 रोजी एनबीसी टीव्हीच्या "आमेन" या कार्यक्रमात विशेष पाहुण्या म्हणून हेल यांचे दर्शन झाले. कार्यक्रमाच्या "द टॅलेंट शो" नावाच्या भागात *क्लिफ्टन डेव्हिस* यांनी साकारलेले पात्र रेव्हरंड ग्रेगरी यांनी चर्चच्या एका वार्षिक समारंभात माता हेल यांचे स्वागत केले. समारंभात हेल हाऊसवर एक लघुपट दाखवला गेला. ग्रेगरी यांनी *तुम्ही माझी मुलं आहात* हे गीत गायले. मग त्यांनी कार्यक्रमातून मिळालेले उत्पन्न हेल हाऊसला देणगी देण्यात येईल, असे जाहीर केले. या कार्यक्रमात हेल यांना आमंत्रित करायची कल्पना कार्यकारी निर्माता *एड वेनबर्गर* आणि मालिकेची स्टार *ॲना मारिया हॉर्सफोर्ड* यांची होती. हॉर्सफोर्ड यांनी वेनबर्गर यांना क्लारा हेल यांच्या हार्लेममधील विलक्षण कामाची माहिती दिली. त्यामुळे वेनबर्गर प्रभावित झाले. त्यांनी हेल हाऊसला देणगी द्यायचे ठरवले आणि क्लारा हेल यांना कार्यक्रमात आमंत्रित केले. हेल यांच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला खूप प्रसिद्धी मिळाली.



कित्येक प्रसिद्ध आणि महत्त्वाच्या व्यक्तिंनी क्लारा हेल यांना पाठिंबा दिला. चित्रात हेलसोबत आहेत, माजी अमेरिकी सर्जन जनरल सी. एव्हरेट कूप (डावीकडे) आणि सिनेट सदस्य अल्फान्सो डी'अमाटो.

## भविष्याबाबत साशंक

हेल हाऊसचे भविष्य फार उज्ज्वल नव्हते. 1990 साली हेल हाऊसवर अचानक काळे मळभ दाटून आले. शहर प्रशासनाने हेल हाऊस बंद करायचा निर्णय घेतला. अधिकाऱ्यांच्या मते, ड्रग ॲडिक्ट मुलांसाठी शासनाने पुरेशी संगोपन केंद्रे उपलब्ध केली होती. त्यामुळे बालवाडी चालवणाऱ्या हेल हाऊससारख्या एजन्सीची गरज उरली नव्हती. प्रशासनाला असेही वाटत होते की लहान मुलांची वाढ संगोपन केंद्रातच चांगल्या रितीने होते. यावर बऱ्याच बाल-विशेषज्ञांचे एकमत झाले.

पण क्लारा हेलच्या मनात काही वेगळेच होते. “मी माझं काम सोडून देणार नाही,” त्यांनी ठामपणे सांगितले. “ही देवाची मुलं आहेत. त्यांची देखभाल मी करावी असं देवाच्याच मनात आहे.” आपल्या कामाची आता गरज नाही, मूल्य नाही हे मानायला हेल तयार नव्हत्या.

शहर प्रशासनाने ड्रग ॲडिक्ट मुलांना हेल हाऊसमध्ये पाठवणे बंद केले. त्यावेळी हेल हाऊसमध्ये फक्त दहा मुले राहात होती. त्यांनाही त्यांच्या नातेवाईकांकडे किंवा आईवडिलांकडे परत पाठवायचे होते. भविष्याबाबत साशंकता वाटल्यामुळे हेल यांनी आपल्या समर्थकांकडे मदत मागितली.

हेल हाऊसने एक आणीबाणी निधी सुरू केला. त्यांनी ठिकठिकाणी सुमारे एक लाख स्टिकर चिकटवली. त्यावर लिहिले होते: *प्रशासनाचा नकार, पण आमचा होकार. हेल हाऊसला पाठिंबा द्या.* यानंतर लोकांनी व्यक्तिगत स्तरावर हेल हाऊसला भरघोस देणग्या पाठवल्या.

शहर प्रशासनाशी असा संघर्ष सुरू असताना 100 कृष्णवर्णीय स्त्रियांच्या राष्ट्रीय संघटनेने हेल यांचा सन्मान केला. त्यांनी हेलला *कँडेसे* पुरस्कार प्रदान केला. हा पुरस्कार प्राचीन इथियोपीयन राणीच्या नावे दिला जातो. दरवर्षी 10 सर्वोत्कृष्ट कृष्णवर्णीय अमेरिकी लोकांना हा पुरस्कार देतात. विविध क्षेत्रांत आपल्या उत्तम चारित्र्याने आणि कर्तृत्वाने छाप पाडणाऱ्या व्यक्तिंना हा पुरस्कार दिला जातो.

## भय

हेलने स्वत:ला मुलांमध्ये गुंतवून ठेवले. त्यांनी एकदा 14 वर्षे वयाच्या मुलामुलींसोबत गप्पा मारण्यासाठी खास वेळ काढला. या मुलांवर ड्रग्ज सेवनासंबंधी खटले सुरू होते.

अल्पवयीन न्याय विभागाने या भेटीची योजना आखली होती. ड्रग्ज शरीरात कोणत्या अवयवांमध्ये शिरकाव करते आणि काय नुकसान करते, हे या मुलांच्या लक्षात आणून द्यावे, अशी या विभागाची इच्छा होती.

हेलने या मुलांशी निखळपणे गप्पा मारल्या आणि त्यांचा उत्साह वाढवला. त्यांना स्वत:विषयी छान वाटेल असे काही त्या त्यांच्याशी बोलल्या. यामुळे मुलांना ड्रग्ज, अपराध आणि नैराश्य यांच्या जंजाळातून सुटण्यास मदत होईल, अशी आशा हेल यांना वाटत होती.



राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन यांनी वार्षिक सभेत हेल यांच्या कामाचे टाळ्यांच्या गडगडाटात कौतुक केले. हेल यांच्या उजवीकडे नॅन्सी रेगन उभ्या आहेत.

“तुम्ही काळे आहात, याचा अभिमान बाळगा,” हेल मुलांना म्हणाली. “आपण मोठमोठी कामं करू शकतो.” मग हेलने तिथे एकत्र जमून परस्परसंवाद केल्याबद्दल मुलांचे कौतुक केले. “कुणाचा तिरस्कार करू नका,” हेलने त्यांना सल्ला दिला.

एप्रिल 1991 पर्यंत, हेल हाऊसला देशभरातून हजारो डॉलरच्या देणग्या मिळाल्या. 250 चर्चनीही त्यांना काही निधी पुरवला. क्लारा हेलला या सर्वांतून स्फूर्ती मिळाली. “या मुलांची देखभाल करायची जबाबदारी देवानेच माझ्यावर सोपवलीय,” त्या म्हणतात. “आता आम्ही मुलांना पहिल्यापेक्षा चांगली सोयीसुविधा देऊ शकतो.” हेल हाऊस पुन्हा जोमाने सुरू झाले. 1992 पर्यंत, हेल आणि त्यांचे कर्मचारी यांनी हजारपेक्षा जास्त ड्रग ॲडिक्ट मुलांचे संगोपन केले.

नोव्हेंबरमध्ये, क्लारा हेल यांना पक्षाघाताचा छोटासा धक्का बसला. त्या त्यातून बऱ्या होत होत्या. पण अचानक, 18 डिसेंबर 1992 रोजी, काही गुंतागुंत झाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. त्यावेळी त्यांचे वय 87 वर्षे होते.



एड्सने पिडीत लहान मुलांची देखभाल करण्यासाठी शासनाने पहिला राष्ट्रीय निवासी प्रकल्प सुरू केला. त्या कार्यक्रमात क्लारा माता हेल, हेल हाऊसच्या संस्थापक, यांनी एका मुलाला कडेवर घेतलेले दिसत आहे.

## क्लारा हेलचा वारसा

हेल यांच्या निधनामुळे जगाने एक अत्यंत प्रेमळ माणूस गमावला. पण त्यांच्या संगोपनाच्या आणि उपचाराच्या पद्धती आजही हेल हाऊसमध्ये जिवंत आहेत. हेल हाऊसच्या यशाने जगाला दाखवून दिले की प्रेम आणि समजूतदारपणा यांच्यामुळे अत्यंत गंभीर समस्या, अगदी ड्रग ॲडिक्शनवरही, मात करता येते. एवढेच नव्हे, हेल हाऊसने आयुष्यात निराश आणि उद्‌ध्वस्त झालेल्या लोकांच्या जीवनात आशेचा, आनंदाचा किरण प्रकाशित केला.

नॅन्सी ही ड्रगच्या व्यसनातून मुक्त झालेली आई म्हणते, “माता हेल या माझ्या आयुष्याला लाभलेलं एक सर्वोत्तम वळण आहे. त्यांनी मला आणि राफेलला माणूस बनायची संधी दिली.”

क्लारा हेल यांनी मार्ग दाखवल्याबद्दल आपण सर्व त्यांचे शतशः ऋणी आहोत.